८०

वाचले :- १) उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेकडील पत्र क्र.उ.वि.अ./जमिन/गुरचरण/२०१०, दि.२८/६/२०१०
२) ग्रामपंचायत, बामणगांव यांचेकडील ठराव क्र.७४ (१) दि.२३/६/२०१०
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचेकडील जा.क्र.राजिप/साप्रशा/व्हिपी-४/३२२६/२०१०, दि.१०/१२/२०१०
४) या कार्यालयाचे पत्र क्र.मशा/जमिन/अ-२/स्मारक/२०१०, दि.१३/७/२०१०
५) शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील पत्र क्र.जमीन २८११/प्र.क्र.२७१/ज-४, दि.२८/३/२०११
६) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ५१ (१अ)
७) कार्यालयीन मंजुर टिपणी क्र. दिनांक २८/०३/२०११

---

क्र.मशा/जमीन/अ-२/१६८९०/२०११
जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड
अलिबाग, दि.२५/०३/२०११

आदेश

२/- रायगड जिल्हयामध्ये डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्मारक उभारणेचे काम पर्यटन व सांस्कृतीक विभाग, महाराष्ट्र शासन व वन विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागाकडून कार्यान्वित होत असल्याने, सदरचे कामी रायगड जिल्हयामध्ये सुयोग्य अशी जागा निश्चित करुन सदर जागेची चौकशी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेमार्फत करुन, सविस्तर प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत शासनास सादर करण्यांत आला आहे.

३/- उपोद्घातातील अ.क्र.५ कडील नमुद शासन, महसूल व वनविभागाकडील पत्र दि.२८/३/२०११ अनुसार मौजे वढाव खुर्द, ता.अलिबाग, जि.रायगड येथिल गट क्र.११७ पैकी १२-००-०० हे.आर. सरकारी गुरचरण जमिनीचा आगाऊ ताबा देणेबाबत डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांचे स्मारकासाठी पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना विशिष्ट अटी व शर्तीवर देण्यांस शासनाने मंजुरी दिलेली आहे.

४/- प्रश्नाधिन जमीन गुरचरण असून, ग्रामपंचायत बामणगांव यांनी ठराव क्र.७४ (१) दि.२३/६/२०१० अन्वये डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मारकासाठी देण्यास हरकत नाही असा ठराव संमत केला आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांनी उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये उक्त जमीन डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मारकासाठी देण्यास शिफारस दिली आहे.

५/- वरील वस्तुस्थिती विचारांत घेता मी, जिल्हाधिकारी रायगड मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शासन पत्रानुसार पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना मंजुर केलेली जमीन गुरचरण असल्याने, ही जमीन मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५१ (१) अ मधील तरतूदीनुसार या आदेशान्वये शासनाकडे पुर्नग्रहण करण्यांत येत असून, ७/१२ सदरी "महाराष्ट्र शासन बिनआकारी पड " अशी नोंद ठेवून मौजे वढाव खुर्द, ता.अलिबाग येथिल गट क्र.११७ क्षेत्र १७-७७-०० हे.आर. पैकी १२-००-०० हे.आर. शासकीय गुरचरण जमीन पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांस डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या स्मारकासाठी आगाऊ ताबा खालील अटी व शर्तीवर देण्यांचे आदेश देत आहे.

अटी / शर्ती :-

१) सदर जमिनीचा आगाऊ ताबा हा शासनाचे अंतिम आदेशाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
२) विषयाधिन जमिनीचा वापर तथा विकास स्थानिक नियोजन प्राधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.